**संक्षिप्त खटला क्र. ८९/२०२०**
**मनोज मारुती शिर्के वि. जिग्नेश नरोत्तम पटेल**

## निशाणी क्र.१ वरील आदेश

(CNR No. MHRG090002402020)

१. फिर्यादपत्रक, फिर्यादीची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०० ची तपासणी नि.क्र.५ व फिर्यादसोबतची कागदपत्रे विचारात घेतली. फिर्यादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. जी. सावंत यांचा युक्तिवाद ऐकला.

२. फिर्याद, फिर्यादीच्या शपथेवर नोंदवलेल्या पडताळणीवरुन आरोपीने दि. १६.०३.२०२० रोजीचा रक्कम रु.१,००,०००/– चा त्याच्या कोटक महिंद्रा बँक, शाखा खारघर, नवी मुंबई, खाते क्र. ४१११५१३१४५ धनादेश क्र. ०००१३२ फिर्यादीला कायदेशीर जबाबदारी फेडण्यासाठी दिल्याचे दिसते. सदर धनादेश फिर्यादीने त्याचे स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा नागोठणे येथील त्याच्या खात्यात वटवण्यासाठी दि.१६.०३.२०२० रोजी सादर केला असता सदर धनादेश दि. १८.०३.२०२० रोजी न वटता बँकेच्या 'फन्डस् इनसफिशिअंट' या शेऱ्यासह परत आल्याचे दिसते.

३. फिर्यादीने आरोपीला दि.०३.०४.२०२० रोजी पाठवलेली नोटीस आरोपीला त्याच दिवशी मिळाली. नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांचा अवधी हा दि.१८.४.२०२० रोजी संपला. तेव्हापासून एक महिन्याच्या आत फिर्याद दाखल करणे बंधनकारक होते. प्रस्तूतची फिर्याद ही दि.९.६.२०२० रोजी दाखल करण्यात आली आहे. या दरम्यान कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन होता. मा.सर्वोच्च न्यायालयाने **suo moto writ(civil) No.3 of 2020** यात दि.२३.३.२०२० रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार सर्व प्रकरणांमधील मुदत ही दि.१५.३.२०२० रोजीपासून उपरोक्त प्रकरणातील पुढील आदेशापर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच उपरोक्त प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने दि. ६.५.२०२० रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार परक्राम्य संलेख अधिनियमाच्या कलम १३८ मध्ये नमूद केलेली संपूर्ण मुदत ही १५.३.२०२० रोजी पासून त्या प्रकरणातील पुढील आदेशापर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे या बाबी विचारात घेता प्रस्तूतची फिर्याद मुदतीत असल्याचे दिसून येते. म्हणून आरोपीने प्रथमदर्शनी चलनक्षम दस्तऐवज अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वये दंडनीय अपराध केल्याचे दिसते. म्हणून आरोपीविध्द आदेशिका जारी करण्यास पुरेसे कारण आहे

अशी माझी खात्री झाली आहे. या कारणास्तव खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

(अ) आरोपीविरुध्द फौ.प्र.सं., १९७३ चे कलम २०४ अन्वये चलनक्षम दस्तऐवज अधिनियम, १८८१ चे कलम १३८ नुसार दंडनीय अपराधासाठी आदेशीका जारी करण्यात येते.

(ब) आरोपीला समन्स काढावे.

(क) मा. सर्वोच्च न्यायालयाने दामोदर एस. प्रभु वि. सय्यद बाबालाल २०१० ए.आय.आर. (एस.सी.) १९०७ मध्ये दिलेले निर्देश नोंद करावेत.

(ड) आरोपीने प्रकरणात हजर झाल्यानंतर पहिल्या अथवा दुसऱ्या तारखेला अपराध तडजोडीने मिटवण्यास अर्ज केल्यास व त्याप्रमाणे तडजोड मान्य होताना आरोपीवर कोणताही खर्च लादला जाणार नाही.

(इ) आरोपीने प्रकरणात दुसऱ्या तारखेनंतर पुढे कोणत्याही टप्प्यावर अपराध तडजोडीने मान्य केला तर फिर्यादीत नमूद धनादेशाच्या १० टक्के रक्कम मा.जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांच्याकडे जमा करण्यासाठी या न्यायालयात भरण्याची अट लादण्यात येईल व अपराध तडजोडीने या अटींची पुर्तता केल्यानंतरच मिटेल.

(फ) आरोपीला पुढे असेही सुचित करण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने नमुद प्रकरणात दिलेल्या निर्देशानुसार मा. उच्च न्यायालय अथवा मा. सत्र न्यायालयात अपील अथवा रिव्हीजन दाखल झाल्यानंतर तडजोड करायची असल्यास फिर्यादीत नमुद धनादेशाच्या १५ टक्के रक्कम भरावी लागेल.

(ग) आरोपीने मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल अथवा रिव्हीजन दाखल झाल्यावर तडजोड करायची असल्यास फिर्यादीत नमुद धनादेशाच्या २० टक्के रक्कम भरावी लागेल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Sameer Dilip Kamalakar
Date: 2021.01.29 15:50:35 +0000

दि.२९.०१.२०२१

(स. दि. कमलाकर)
प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, रोहा.